माहिती हवीय?

संदीप खोपडे, धनकवडी.

□ मिथुन चक्रवर्ती व पद्मिनी कोल्हापुरे यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केल्या? त्यातील हिट चित्रपट कोणते?

– *प्यार झुकता नही, प्यारी बहना, ऐसा प्यार कहाँ, मुद्दत, स्वर्ग से सुंदर, सागर संगम, दाता, दानापानी, हम इंतजार करेंगे* हे मिथुन-पद्मिनी या जोडीचे चित्रपट. यांपैकी *प्यार झुकता नही* व *प्यारी बहना* हे त्यांचे हिट चित्रपट.

पी. एस. म्हपसेकर, गोवा.

□ सोहनलाल कंवरने फिल्मनगरच्या बॅनरखाली कोणकोणते चित्रपट निर्माण केले?

– *पहचान, सीमा, बेईमान, दो शूळ, संन्यासी, दुनियादारी, नारी, आत्माराम, धनवान, पापी पेट का सवाल, आवारा बाप, स्वार्थी.*

संदेश सावे, ओझर.

□ आपल्या चित्रपटात क्षणभरही दिसला नाही, असा सुभाष घईंचा चित्रपट कोणता?

– सुभाष घईंचा *त्रिमूर्ती* हा चित्रपट मुकुल आनंदने दिग्दर्शित केला होता आणि या चित्रपटात सुभाष घई क्षणभरही पडद्यावर दिसला नव्हता.


भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम कॉजवे.

□ *दादी माँ, दो रास्ते, प्रेमकहानी, माय लव्ह, जनता हवालदार, मेरे हमसफर, आशा, इंकार* या चित्रपटांचे प्रदर्शित वर्ष, कलाकार, संगीतकार, निर्माता-दिग्दर्शक कोण?

– *दादी माँ* १९६६ला आला होता. कलाकार अशोककुमार, बीना राय, तनुजा, डॉ. काशिनाथ घाणेकर, मुमताज, दिलीप राज, रहमान, शशिकला, कन्हैयालाल, डेव्हीड मेहमूद व दुर्गा खोटे. संगीतकार रोशन, निर्माता-दिग्दर्शक एल. व्ही. प्रसाद. *दो रास्ते* १९६९ला पडद्यावर आला होता. कलाकार राजेश खन्ना, मुमताज, बलराज साहनी, वीणा, प्रेम चोप्रा, बिंदू, असित सेन, जयंत, कामिनी कौशल; लीला मिश्रा, मेहमूद(ज्यू), रणधीर, बिरबल, संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता-दिग्दर्शक राज खोसला. *प्रेमकहानी* नावाचा चित्रपट दोन वेळा आला. १९३७ला पहिला, कलाकार अशोककुमार, मायादेवी, मधुरिका, एन. एम. जोशी, विमला देवी, पीठावाला, सरोज बोरकर. मुमताज अली, मनोहर घटवाई. निर्माता बॉम्बे टॉकीज, दिग्दर्शक फ्रॅन्झ ओस्टेन, संगीतकार सरस्वती देवी. दुसरा *प्रेमकहानी* १९७५ला आला होता. कलाकार राजेश खन्ना, मुमताज, शशी कपूर के. एन. सिंग, त्रिलोक कपूर, मुराद, पूर्णिमा, दुलारी, लीला मिश्रा, विनोद खन्ना. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता लेखराज खोसला, दिग्दर्शक राज खोसला. *माय लव्ह* १९७०ला आला होता. कलाकार शशी कपूर, शर्मिला टागोर, राजेंद्रनाथ, अजरा, मदन पुरी, लक्ष्मी छाया, जयंत , राज मेहरा, इफ्तेकार, मनोरमा, सुलोचना चटर्जी, संगीतकार रामसिंग, निर्माता अतुल आर्ट्स, दिग्दर्शक बी. सुखदेव. *जनता हवालदार* १९७९ला पडद्यावर आला. कलाकार अशोककुमार, राजेश खन्ना, हेमामालिनी, योगिता बाली, धुमाळ, मोहन चोटी. संगीतकार राजेश रोशन, निर्माता मनोहरलाल पी. छाबरिया. दिग्दर्शक मेहमूद. *मेरे हमसफर* १९७०ला आला होता. कलाकार जितेंद्र, शर्मिला टागोर, बलराज साहनी, जीवन, लक्ष्मी छाया, सुरेश शम्मी, सुंदर, मोहन शेरी, प्रकाश थापा, केस्तो मुखर्जी, संगीतकार कल्याणजी-आनंदजी. निर्माता युसूफ तेदरवाजवाला, दिग्दर्शक दुलाल गुहा. *आशा* नावाचा चित्रपट चार वेळा आलाय. १९३८ला पहिला आशा आला होता. कलाकार कमलेशकुमारी, विजयकुमार. पूर्णा चौधरी, आर. पी. कपूर, तुलसी लाहिरी, देववाला, नटवर, कामरान. संगीतकार विक्रम चौधरी, निर्माता फिल्म कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, दिग्दर्शक पेरी देवोआ, रणजीत सेन. १९४८ला दुसरा *आशा* आला होता. कलाकार शांता कुंवर, सोहन कपिला, सॅम्सन, शिवराज, उर्वशी, तिवारी. संगीतकार खेमचंद प्रकाश, दिग्दर्शक मेघानी, निर्माता बॉम्बे टॉकीज, १९५७ला तिसरा *आशा* आला होता. कलाकार किशोरकुमार, वैजयंतीमाला, ओमप्रकाश, प्राण, ललिता पवार, राज मेहरा, मिनू मुमताज, रणधीर, धुमाळ, सुंदर, आशा पारेख, संगीतकार सी. रामचंद्र, निर्माता-दिग्दर्शक एम. व्ही. रामण, १९८०ला चौथा *आशा.* कलाकार जितेंद्र, रीना रॉय, रामेश्वरी, गिरीश कर्नाड, सुलोचना, भगवान दुलारी, शक्ती कपूर. संगीतकार लक्ष्मीकांत-प्यारेलाल, निर्माता-दिग्दर्शक जे. ओम प्रकाश. *इंकार* नावाचा चित्रपट दोनदा आला. १९४३ला पहिला. कलाकार पहाडी संन्याल, लीला देसाई, सुनलिनीदेवी, जगदीश सेठ्ठी, विमला वसिष्ठ, स्वर्णलता, पुतलीबाई, आगा. संगीतकार अशोक घोष, दिग्दर्शक सुधीर सेन, निर्माता लक्ष्मी प्रॉडक्शन. १९७७ला दुसरा *इंकार* आला होता. कलाकार विनोद खन्ना, विद्या सिन्हा, डॉ. श्रीराम लागू, साधू मेहर, अमजद खान, लीली चक्रवर्ती, एम. राजन, रंजोता टकर, शीतल, मा. राजू, भरत कपूर, संगीतकार राजेश रोशन, दिग्दर्शन राज एन. सिप्पी, निर्माता रोम एन. सिप्पी.

रविकांत साखरे, जामखेड.

□ अविनाश वाधवानने कोणकोणत्या चित्रपटात नायकाची भूमिका केली?



गीतमध्ये दिव्या भारती - अविनाश वाधवान

– *गीत, आयी मिलन की रात, मीरा का मोहन, दिल की बाजी* यासारख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या चित्रपटातच अविनाश वाधवान नायकाच्या भूमिकेत चमकला.

विनया चवाथे, मुलुंड.

□ परदेशात जाऊन चित्रीकरण करण्याची पद्धत कोणत्या चित्रपटापासून सुरू झाली? आजवर किती मराठी चित्रपटांचं चित्रीकरण पदेशात झालंय?

– १९५४चा नाज परदेशात चित्रित करण्यात आलेला पहिला भारतीय चित्रपट. पण परदेशातील चित्रणाची पद्धत सुरू झाली ती मात्र १९५४च्या राज कपूरच्या *संगम*पासून. *मुंबई ते मॉरिशस* या एकाच मराठी चित्रपटाचं चित्रण आतापर्यंत परदेशात झालंय. ते मॉरिशसला.

राजश्री कुलकर्णी, विलेपार्ले, मुंबई.

□ मेहमूदच्या *कुंवारा बाप*चे दिग्दर्शक कोण? या चित्रपटात मेहमूदची नायिका कोण होती?

– मेहमूदच *कुंवारा बाप*चा दिग्दर्शक होता. रमा प्रभा या चित्रपटात मेहमूदची नायिका होती.